# १५. आपल्या समस्या – आपले उपाय

ADI9NJ

• चित्र पाहा. संवाद वाचा.



**केशव** : बापरे! किती ही गर्दी आणि किती ह्या गाड्या!

**बाबा** : तू आज पाहतोस होय ही गर्दी! रोजच अशी गर्दी असते इथे.

**केशव** : एवढी सगळी माणसं कुठं चालली असतील बरं ! ह्या सगळ्या गाड्यांना किती पेट्रोल, डिझेल लागत असेल ?

**बाबा** : आणि वाहनातून निघणाऱ्या धुराचं काय ?

**केशव** : गर्दी, धूर, वाहनांचे आवाज, कर्कश हॉर्न... कधी एकदाचं इथून लांब जातोय, असं झालं आहे मला.

• तुमच्या शब्दांत उत्तरे सांगा.

(अ) तुम्ही कधी गर्दी असणाऱ्या रस्त्यावर गेला आहात का ?

(आ) रस्त्यावर कोणत्या वेळेला जास्त गर्दी असते ?

(इ) नेमक्या त्या वेळेलाच जास्त गर्दी का होते असे तुम्हांला वाटते ?

(ई) वाहतूक कोंडीमुळे कोणत्या समस्या निर्माण होतात ?

(उ) वाहतूक कोंडी होऊ नये, म्हणून काय काय केले पाहिजे असे तुम्हांला वाटते ?

(ऊ) वाहतूक कोंडीमुळे कोणकोणत्या प्रकारचे प्रदूषण वाढते ?

(ए) हे प्रदूषण कमी व्हावे, म्हणून काय काय करता येईल? आईवडिलांशी, मित्रांशी, शिक्षकांशी चर्चा करा व सांगा.

• **चौकाचौकांत वाहतूक नियंत्रण करण्यासाठी वाहतूक पोलीस उभे असतात. प्रदूषणाचा त्यांना किती त्रास होत असेल, याचा विचार करा. चौकाचौकांतील ध्वनिप्रदूषण, वायुप्रदूषण कमी करण्यासाठी उपाय सुचवा.**

• खालील वाक्ये वाचा. तुम्हांला योग्य वाटत असेल, तर ✓ अशी खूण करा आणि अयोग्य वाटत असेल, तर ✕ अशी खूण करा.

१. एखाद्या गाडीचा छोटासा अपघात झालेला आहे. तो पाहण्यासाठी तेथे गर्दी करणे. ☐

२. ओळखीची व्यक्ती रस्त्यात भेटल्यास, भर रस्त्यात वाहन उभे करून गप्पा मारणे. ☐

३. दुकानात वस्तू आणायला गेल्यावर, आपले वाहन पार्किंगच्या ठिकाणी लावणे. ☐

४. गर्दीमधून जाताना जोरजोराने हॉर्न वाजवणे. ☐

**प्रदूषण ही एक मोठी समस्या आहे.**

- चित्र पाहा. संवाद वाचा.



| | | |
|---|---|---|
| **आई** | : | केवढा हा कचरा! |
| **मिनू** | : | एवढा कचरा येतो कुठून? |
| **आई** | : | कुठून म्हणजे? आपणच करतो कचरा. |
| **मिनू** | : | पण या कचऱ्याला एवढी दुर्गंधी कशी? |
| **आई** | : | ओला कचरा सडल्यानं ही दुर्गंधी येते. |
| **मिनू** | : | बापरे! मला श्वास घेणं अवघड झालं आहे. आई, या कचऱ्याचं काय करत असतील? |

- तुमच्या मनाने उत्तरे सांगा.

(अ) आपण कचरा कशाला म्हणतो?

(आ) घरातील कचऱ्यात कोणकोणत्या वस्तू असतात?

(इ) तुमच्या घरातील ओला व सुका कचरा कोणता ते सांगा.

(ई) तुमच्या घरातील कचऱ्याची विल्हेवाट तुम्ही कशी लावता ते सांगा.

(उ) कचऱ्यातील कोणकोणत्या गोष्टींवर प्रक्रिया करून त्यातून नवीन गोष्टी तयार होऊ शकतात?

(ऊ) तुमच्या वर्गातील कचऱ्यामध्ये कोणकोणत्या वस्तू असतात?

(ए) वर्गात कचरा होऊ नये, म्हणून तुम्ही कोणती काळजी घ्याल?

(ऐ) कचराकुंडीतला कचरा उचलून नेलाच नाही, तर आपल्याला कोणकोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागेल याचा विचार करा. आईवडिलांशी, मित्रांशी चर्चा करून सांगा.

**कचऱ्याची विल्हेवाट लावणे, ही एक समस्या आहे.**

- चित्र पाहा. संवाद वाचा.



| | | |
|---|---|---|
| **राहुल** | : | आजी, त्या रस्त्यानं नको जायला. |
| **आजी** | : | का रे बाबा? |
| **राहुल** | : | बघ, तिथे किती कुत्री आहेत! |
| **आजी** | : | हो रे बाबा. कधी कधी सगळी एकदम अंगावर धावून येतात. |
| **राहुल** | : | अगं आजी, या कुत्र्यांमुळे रस्त्यावरून एकट्यानं जायला मला खूप भीती वाटते. |
| **आजी** | : | अरे, कुत्री जोरजोरानं भुंकू लागली, तर आमच्यासारख्यांच्या हृदयाची धडधड वाढते. |

- वरील विषयावर चर्चा करा. याविषयी तुम्हांला पडणारे प्रश्न लिहा.